# शेतकऱ्यांनी व्यावसायिक शेतीकडे वळावे

**अंगद देवकर**
कृषि पदवी विद्यार्थी

शेती हा जगातील सर्वत्र व्यापलेला व्यवसाय आहे, अर्थात देशात / जगात असे बरेच लोक आहेत जे पिके, भाजीपाला, फळे, फुले व गुरेढोरे पाळुन आपली उपजीविका मिळवतात. भौगोलिक परिस्थिती, तंत्रज्ञानाची पातळी, उत्पादनांची मागणी यावर आधारित शेतीचे प्रमुख वर्गीकरण आहे, म्हणजे निर्वाह शेती आणि व्यावसायिक शेती. निर्वाह शेतीत, शेतकरी स्थानिक वापरासाठी पिकांच्या उत्पादनात सामील आहे. तर व्यावसायिक शेती, हे नावावरून स्पष्ट होतेच, अशी शेती पद्धत ज्यात शेतकरी व इतर कामगार हे व्यावसायिक हेतूने पिकांच्या उत्पादनात गुंतले आहेत. हा लेख उतारा व्यावसायिक शेतीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करतो.

शेती व्यतिरिक्त व्यवसाय हे येत्या काळात डबघाईस येतिल. त्याच सविस्तर स्पष्टीकरण काही ऊदारणासही लेखात आहे.

सुरूवातीला तालुक्यात फार फार तर एक- दोन जेसीबी (पोकलेन) होते आता प्रत्येक गावात किंबहुना गल्लीत कितीतरी जेसीबी /पोकलेन झाले आहेत परिणामी ग्राहक कमी झाले, कामाच्या किंमती सोबतचं डिझेलचे दरही एवढे वाढले कि नफा कमी झाला परिणाम धंदा कमी होतं आलायं.

पहिले दहा वर्षापूर्वी पेट्रोल पंप विस - पंचवीस किलोमीटरवर होते. पण आता मात्र पाच किलोमीटर वर आहेत भविष्यात एक किलोमीटर पण येऊ शकतील.

इतर कुठलेही दुकान घ्या.. कापड दुकान,मोबाईल दुकान, हार्डवेअर वा कुठलेही सेल्सचं दुकान.. आपल्याला गल्लोगल्ली पाहायला मिळतात त्याचा परिणाम ग्राहक कमी झाले. भविष्य हे अंधारात जाईल कारण हल्ली ऑनलाईन शॉपिंग कंपनी आज होलसेल व ग्राहकांना त्यांच्या घरापर्यंत सेवा देत आहे त्यामुळे ऑनलाईन शॉपिंग वाढत आहे. येत्या काळात काही वर्षानंतर हे सर्व व्यवसाय बंद किंवा मंद अवस्थेत आपल्याला दिसतील यात तिळमात्र शंका नाही.

पण या सर्वांच्या ऊलट.. शेती हा उत्तम व्यावसाय आहे

तसं पाहिलं तर शेती हा खानदानी / परंपरागत व्यवसाय आहे, ऐके काळी शेती व्यवसाय हा वरिष्ठ व नोकरी हा कनिष्ठ मानला जायचा. आज ही शेती व्यवसाय वरिष्ठच आहे फक्त कष्ट नको म्हणून आपणाला नोकरी वरिष्ठ वाटायला लागली, हेच कटु सत्य आहे. पण शेती हा व्यवसाय पहिल्या सारखा परंपारिक कष्टाचा राहिला नाही. त्यात दिवसेंदिवस अमुलाग्र /कमालीचे बदल होताना दिसत आहेत. यांत्रीकीकरणामुळे अनेक कामे सोपे झाले आहे. शेती हा व्यवसाय पूर्वीपासून सुरु आहे म्हणुन भारत देश हा सत्तर टक्के कृषी प्रधान आहे.शेती व्यवसाय हा पिढ्यान पिढ्या टिकणारा आहे आज तुम्ही करताय उद्या तुमचे मुलं करतील तो न बंद होणारा व्यवसाय आहे, आज कोणताच शेतकरी जमीन विकायला तयार नाही, कोणाची जमीन विकाऊ असली तरी एक पण नोकरीवाला शेती विकत घेऊ शकत नाही.. किंबहुना तो कसु शकत नाही. अगदी बारा लाख रुपये पॅकेज असलेला व्यक्तिसुद्धा दोन एकर शेती घेऊ शकत नाही.

शेती हा उत्तम/टिकाऊ व्यवसाय आहे, सद्य परिस्थिती पाहता भविष्यात नोकरी शाश्वत राहणार नाही म्हणूनच शेती व शेतकऱ्याला महत्व येणार आहे, शेतकरी मुलाची किंमत येत्या काळात आपल्याला कळेल. त्या वेळेस आपल्याकडे पश्चाताप शिल्लक राहील. त्यामुळे शेती न विकता त्याकडे व्यावसायिक दृष्टीकोनातुन बघुन त्याकडे वळावे. शेती व्यवसायात ना कुठलं टार्गेट, ना कोणी आपलं मालक, ना कॉम्पिटिशन. ऊलट व्यवसाय कायम स्वरूपी टिकाऊ व शाश्वत आहे.

शेतात थोडे फार काम केल्यामुळे शरीर मजुबूत राहते, प्रदूषण मुक्त हवा, सर्व भाजीपाला, दुध, आपल्याच शेतातील उपलब्ध, ना भाड्याने राहण्याची गरज, गावाकडे स्वत:च्या घरीच.

शेतकरी हा परत बळीराजा होणार आहे फक्त काही वेळ लागेल. नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करा, कमि खर्चात अधीक ऊत्पन्न वाढवुन देणारे तंत्र विकसित करा

### शेती आवडीने करा शेती व्यवसाय म्हणून करा.

शेती हा व्यवसाय कधी बंद न होणारा. नैसर्गिक आपत्ती आली तरी त्यातुन सावरण्याची ताकद त्या शेतकरी राजात आहे. शेती हा उत्तम व टिकाऊ व्यवसाय आहे त्याला जगातील कोणतीच कंपनी टक्कर देऊ शकत नाही किंवा त्याला कॉम्पिटिशनही देउ शकत नाही. गरज आहे ती आपण फक्त शेतीकडे व्यवसायिक दृष्टीने बघण्याची, जगाच्या पाठीवरील सर्वात जास्त व्याप्ती असलेली इंडस्ट्री म्हणुन बघण्याची. दृष्टी बदला दृष्टिकोनही नक्किच बदलेल.

जगातील सर्व देशांचा सामाजिक-आर्थिक विकास मुख्यत: त्याच्या शेतीवर अवलंबून असतो, कारण हा अनेकांच्या रोजगाराचा स्रोत आहे, तसेच यामुळे देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) भर पडते. खरंच, एखाद्या देशात शेतीची जितकी जास्त वाढ होईल तितकाच त्याचा व्यापार आणि उद्योग भरभराट होईल.

**||अन्नदाता सुखी भव:||**

(संपर्क: +९१ ७७०९४६३५२६)

★ ★ ★